G.M. Vedak Vidhya mandir Tala-Raigad

SQAAF A+

लोकमत

वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय ठरले अव्वल

लोकमत न्यूज नेटवर्क

तळा : श्री गो.म. वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयास शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा अंतर्गत बाह्य मूल्यांकनात 'अ' प्लस श्रेणी प्राप्त करून राज्यातील गुणवत्तापूर्ण शैक्षणिक संस्थेमध्ये शाळेने आपले स्थान अधिक भक्कम केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यातील सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे येथे राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षाची स्थापना करण्यात आली होती. त्यानुसार सन २०२४- २०२५ मध्ये राज्यातील १,०२६७५ शाळांनी स्वयं मूल्यांकन पूर्ण केले. स्वयं मूल्यांकनात गुण मिळवणाऱ्या शाळापैकी सन २०२५-२०२६ मध्ये १०,७७२ शाळांची बाह्य मूल्यांकनासाठी निवड करण्यात आली होती. त्यापैकी १०,६४४ शाळांचे बाह्य मूल्यांकन पूर्ण झाले. या प्रक्रियेत राज्यातील ४२९ शाळा व रायगड जिल्ह्यातील १० शाळांना 'अ' श्रेणी प्राप्त झाली असून त्यामध्ये वेदक व एक नामवंत शाळा ठरली आहे.

उच्चविद्याविभूषित शिक्षक वर्ग व गुणवत्ता पूर्ण शैक्षणिक वातावरणामुळेच महाविद्यालयास 'अ' प्लस श्रेणी प्राप्त झाली आहे.

विविध स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांची बाजी

१ गो.म. वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयातील सुसज्ज ग्रंथालय, संगणक कक्ष, विद्यार्थ्यांना पिण्यासाठी आरओचे पाणी, स्मार्ट बोर्डद्वारे अध्यापन, विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम, तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन, विविध सराव परीक्षांचे आयोजन, विविध परीक्षेसंबंधी समुपदेशन यासारखे उपक्रम यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जात आहे.

२ या उपक्रमांचे फलित म्हणून अनेक विद्यार्थ्यांनी दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर कला, क्रीडा, विज्ञान प्रदर्शन, निबंध, वक्तृत्व आणि सांस्कृतिक स्पर्धांमध्ये ही विद्यार्थ्यांनी जिल्हा व राज्यस्तरावर उल्लेखनीय यश मिळवले आहे.

Hello Raigad
Page No. 4 Feb 25, 2026
Powered by: erelego.com

1.	links
SQAAF A+	https://www.youtube.com/watch?v=ha72Apc6H04